# भारत माझा देश आहे



मनोज राजपूत

# भारत माझा देश आहे

मनोज राजपूत

ई साहित्य प्रतिष्ठान

# भारत माझा देश आहे

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

भारत माझा देश आहे (लघुकादंबरी)

मनोज राजपूत
१४३, क्रांतीनगर शिरपूर ,जि. धुळे महाराष्ट्र
पिन - ४२५४०५
mob – 9767954100
Email - mnjgirase@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

निर्मिती सहाय्य (Proofreading) : योगिनी गुप्ते-शिर्के

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २८ ऑगस्ट २०१८



- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

लेखकाचे मनोगत



सर्व प्रथम सदा सर्वकाळ सर्वांना मनापासून शुभेच्छा , सर्व वाचक ,लेखक आणि टीम सर्वांना . . आरोग्य , वैभव आणि नाते संबंधात वृद्धी व्हावी हीच प्रामाणिक इच्छा . आपल्या ई साहित्य प्रतिष्ठान टीमचे मनापासून आभार व्यक्त करतो .आपल्या मराठी भाषेची व्याप्ती वाढावी यासाठी, नवीन लेखकांना लिहिण्यास प्रोत्साहन आणि वाचकांना नवीन विषय तथा विचार वाचण्यासाठी उपलब्ध करण्याच्या या यशस्वी उपक्रमा बद्दल मनापासून आभार .

पुस्तक वाचन करणे आणि त्यासोबत माणसांना वाचणे हे मला मनापासून आवडतं. जितकं पुस्तकं वाचून मनुष्य शिकतो तितकच किंबहुना त्या पेक्षा जास्त लोकांकडून शिकायला मिळतं, असं मला व्यक्तिगत वाटतं कदाचित ते चुकीचं हि राहू शकतं पण माझ्या बाबतीत ते खरं आहे . शेवटी पुस्तकापेक्षा माणसंच जास्त शिकवतात, नाही का ?

मी सध्या पुणे येथे एका सामाजिक संस्थे मध्ये counselor म्हणून कार्यरत आहे.

पहिल्या पुस्तकाला छान प्रतिसाद मिळाला त्या बद्दल सर्व वाचक, आणि ई साहित्य टीम चे मना पासून आभार . आता दुसरा प्रयत्न मांडत आहे . विषय आधीपेक्षा अगदी भिन्न आहे .

अनुभव व्यक्तीला खूप काही शिकवतो हे जर खरं असेल , तर मग माझ्या कडे त्यांची कमतरतच नाही. काही आपले, काही इतरांचे अनुभवातून या पुस्तकात थोडं मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कारण आपलं आयुष्य इतकं मोठं नाहीच कि सर्व गोष्टी आपण स्वत:च्या अनुभवांनी शिकू. असो पण घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीमधून व्यक्ती शिकते हेच खरं, आणि शिकलं पाहिजे कारण कोणता अनुभव कोणती गोष्ट केव्हा कुठली शिकवण देऊन जाईल सांगता येत नाही .

So learn from everyone and everything . . .

भारत माझा देश आहे . या लघुकथेचं नाव वाचून खूप लोकांना वाटेल या लिह्णारयाला येड लागलं कि काय !! त्याला “भारत आपला देश आहे” हे सुद्धा माहित नाही आणि म्हणून सांगतोय . काही आपल्या कडे असलेलं मतदान कार्ड बघतील आणि भारत सरकार ने , हा देश आपला आहे याचा दिलेला पुरावा दाखवतील . पुढे जाऊन काही कायदा माहित असणारे संविधानातील कलम ५ ते ११ भारतीय नागरिक असण्याचा सांगेल . वरील सर्व गोष्टी दाखवण्याचं अथवा सांगण्याचं काहीच आवश्यकता नाही कारण फक्त अधिकाराने अथवा मतदान कार्ड ने आपलं भारतीयत्व ठरत नाही. ते फक्त एखाद्या पुराव्या इतकं लहान नाही ,ते त्या पलीकडे आहे . वरील सर्व गोष्ट हक्क साठी आणि संरक्षणा साठी आहेत .

मग तरी प्रश्न पडला असेल कि मी असं का म्हणतोय ??

पुस्तक वाचून पूर्ण करे पर्यंत तुम्हाला त्या प्रश्नाचं उत्तर मिळाले असेल.

आपण सर्व भारतीय नागरिक आहोतच आणि त्याचा मला सार्थ अभिमान आहेच, पण फक्त हक्क मागण्यासाठी नाही तर कर्तव्य बजावण्यासाठी .

“आपलं भारतीयत्व फक्त अधिकाराची टोपली घेऊन मागण्यासाठी नाहीच तर ते कर्तव्याने पडलेली घाण टोपलीत उचलण्यासाठी सुद्धा आहे .”

मला स्वताला एक प्रश्न पडला होता .

जेव्हा मी देशासाठी बलिदान, त्याग, सेवाभाव ,परिश्रम ( काहींना हे शब्द जुन्या पिढीच्या म्हाताऱ्या बाबाचे वाटतील पण मी आताच २५ शी ओलांडली आहे . ) असो ,मला ते भाग्य लाभलं कि देशासाठी त्याग करणाऱ्या काही महापुरुषांचा अवशेष , त्याचं अस्तित्व असलेल्या ठिकाणी मी जाऊ शकलो . त्यात महात्मा गांधीजी , नेताजी ,स्वामी विवेकानंद स्वा. वीर सावरकर ई. आणि सर्वांच्या ठिकाणी एक गोष्ट नक्की जाणवली आणि मनाला प्रश्न पडला . . . का ?

त्या “का ?” चा शोध घेण्याचा लहानसा प्रयत्न .

“ अगदी समुद्राचं पाणी त्यात एक थेंब आणि तो थेंब सुद्धा जास्त होईल इतका लहानसा प्रयत्न ” कुठलाही खोटा गर्व, कुठलाही अहंकार न बाळगता , कुठल्याच रंगाचा चष्मा न घालता केला आहे. विषय खूप मोठा आहे . कदाचित मी तो परिपूर्ण मांडण्यात चुकलो असेल , अपयशी ठरलो असेल . . पण माझा प्रयत्न ते उत्तम मांडन्याचाच होता . आणि जे काही राहीलं , चुकलं असेल त्यात तुम्ही भर घालून पूर्ण करावी . नम्र विनंती शेवटी आपण सर्व भारतीयच आहोत .

धन्यवाद . Be Happy

मनोज राजपूत

१४३, क्रांतीनगर शिरपूर , जि. धुळे महाराष्ट्र

पिन - ४२५४०५

mob – 9767954100

Email - mnjgirase@gmail.com

या कथे मधील सर्व पात्रे घटना काल्पनिक आहेत जर चुकून याचा कुठे संबंध आलाच तर तो  निव्वळ योगायोग समजावा. यात कुणाच्या भावना दुखावण्याचा कोणताही उद्देश नाहीच.

भारत माझा देश आहे.


LARGEST NET SALES in any Daily Newspaper Printed in Northern, Southern, Central or Western India.

REGD. No. B111

# The Times of India

ESTABLISHED 1838

NO. 195. VOL. CIX. BOMBAY: FRIDAY, AUGUST 15, 1947 PRICE TWO ANNAS

# BIRTH OF INDIA'S FREEDOM

## NATION WAKES TO NEW LIFE

### Mr. Nehru Calls For Big Effort From People

"INCESSANT STRIVING TASK OF FUTURE"

Assembly Members Take Solemn Pledge

Pandit Nehru

NEW CABINET OF INDIA

WILD SCENES OF JUBILATION IN DELHI

## STATE VISIT TO KARACHI

## FRENZIED ENTHUSIASM IN BOMBAY

### Crowds In Festive Mood

THE national flag was hoisted over the 74-year-old Bombay Civil Secretariat at midnight when the citizens of Bombay greeted the dawn of independence with solemn devotion and frenzied rejoicing.

"Citizens of free India—you are now free",—said the Prime Minister, Mr. B. G. Kher, in raising the flag at the midnight ceremony, which was attended by all Ministers and departmental heads and employees of the Bombay Government.

"MAY BOMBAY PROSPER"

Governor's Message

GOOD WISHES TO FREE INDIA


For CARPETS and FURS visit

OPTICIANS

LALIWALLA & HOMI Ltd.

HORNBY RD. ETC. BOMBAY



“The country cannot make by only one man

It needs all hand together. ”






“आपल्याला मिळालेलं स्वतंत्र खूप लोकांच्या रक्ताने आणि बलिदानाने मिळालं आहे. ते फुकट नाहीच .. ”


THE FUTURE GENERATIONS OF
INDIANS WHO WILL BE BORN,
NOT AS SLAVES BUT AS FREE MEN,
BECAUSE OF YOUR COLOSSAL
SACRIFICE, WILL BLESS YOUR
NAMES AND PROUDLY PROCLAIM
TO THE WORLD THAT YOU,
THEIR FORBEARS, FOUGHT AND
SUFFERED REVERSES IN THE
BATTLE IN MANIPUR, ASSAM
AND BURMA, BUT THROUGH
TEMPORARY FAILURE YOU
PAVED THE WAY TO ULTIMATE
SUCCESS AND GLORY.



“when you  walk on the way of truth .. . you don’t  need to fear,

because .. ”

TRUTH IS GOD.



स्वप्नातला भारत ! !..

# भारत माझा देश आहे

भारत माझा देश आहे ...

एक साथ सावधान! एक साथ विश्राम! सावधान! राष्ट्रीय झंडे को राष्ट्रीय सलामी देंगे सलामी दो...

सर्व पटांगणातून एक साथ हजारोच्या संख्येने आवाज आला.

जय हिंद .......

सर्वांच्या तोंडून एकत्ररित्या तो आवाज गगनात अवकाशात जाऊन परत प्रत्येकाच्या काना पर्यंत आला आणि सर्व स्तब्ध झालो आणि एका आवाजात राष्ट्रगीत सुरु झालं.

जन गण मन अधिनायक जय हे
भारत भाग्यविधाता
पंजाब सिन्ध गुजरात मराठा
द्राविड़ उत्कल बंगा
विन्ध्य हिमाचल यमुना गंगा
उच्छल जलधि तरंगा
तव शुभ नामे जागे
तव शुभ आशीष मागे
गाहे तव जयगाथा

जन गण मंगलदायक जय हे
भारत भाग्यविधाता
जय हे, जय हे, जय हे
जय जय जय जय हे!

सर्वांच्या तोंडून या पवित्र पावन राष्ट्रगीताचा उच्चार होऊ लागला. प्रत्येकजण मनामध्ये भारत मातेला वंदन करत होता, सर्वांचे हात आपल्या भुवयांच्या जवळ पोहचले होते. स्तब्ध, अगदी स्तब्ध उभे राहून सर्व राष्ट्रगीत म्हणत होते,

फक्त म्हणत नव्हते, तर मनातून बोलत होते. प्रत्येकाच्या मनातून राष्ट्रगीताचा शब्द निघत होता कुणीतरी दबाव आणला अथवा इच्छेविरुद्ध करावं लागत आहे असे वाटणारं कुणीच नव्हतं. या स्वतंत्र देशात राहणाऱ्या त्या नाजूक, लहान मुलांचा तो आवाज होता.

आज १५ ऑगस्ट होता, स्वातंत्र्य दिवस संपूर्ण भारतभर आजचा दिवस अगदी आनंदाने साजरा केला जात होता. प्रत्येकाच्या मनात आज रोजच्या विचारांपेक्षा वेगळा विचार होता. बाजारात प्रत्येक दुकानांवर, चहाच्या टपऱ्यावर, तंबाखू च्या दुकानावर, दारू पिणाऱ्याच्या घरापासून तर दारू विकणाऱ्या घरापर्यंत देश भक्तीपर गीत वाजत होते. देशात राहणारा प्रत्येक नागरिक आज काही न काही देशाचं प्रतीक लावून फिरत होता. कपड्याला खिशाला झेंडे स्टीकर इ. लावून फिरत होता. देशाच्या हिताचे काम करणारे सारे देश प्रेम व्यक्त करत होतेच, पण देशाच्या हिताच्या विपरीत काम करणारे सुद्धा देशप्रेम दाखवत होते. भ्रष्टाचार, काळा बाजार अशी कामे करणारे लोक देखील देशप्रेम व्यक्त करत होते, कोण विद्यार्थ्यांना कपडे, झेंडे देत होतं, कुणी भुकेल्यांना जेवण देत होत होतं, कुणी काय, तर कुणी काय! सर्वच काही न काही करण्याचा प्रयत्न करत होते. अगदी मनापसून. आज एकच का दिवस असेना पण सगळे देशाचे चांगले नागरिक म्हणून वावरत होते. प्रत्येकाला त्यांच्या लहानपणी शाळेत केलेल झेंडा वंदन /ध्वजारोहण आठवत होतं, तोडकं मोडकं राष्ट्रगीत आठवत होतं आणि शाळेचा १५ ऑगस्टचा दिवस आठवून सर्व आनंदित होत होते.

मी शाळेत होतो. राष्ट्रगीत सुरु होतं. असंख्य विचार माझ्या मनात एकच कल्लोळ निर्माण करत होते. आज सर्वजण अगदी मनापासून राष्ट्राचा अभिमान बाळगताहेत, रस्त्यावर चुकून पडलेला झेंडा उचलण्यासाठी प्रत्येक व्यक्ती स्वतःहून पुढे होत होता, देशाचा अपमान होऊ नये असंच प्रत्येकाला वाटत होतं आणि म्हणून प्रत्येक व्यक्ती तत्पर होता.

मी आज राष्ट्रगीत म्हणत नव्हतो, तर फक्त ऐकत होतो. आमच्या शाळेतला प्रत्येक मुलगा आणि मुलगी अगदी मनापासून त्या राष्ट्रगीताचा शब्द न शब्द मना पासून उच्चारत होते, त्या तिरंग्याकडे एकसारख्या नजरेने पाहत होते, हात भुवई जवळ होता, सर्व अगदी तल्लीन होते कुणाला जरी चक्कर आल्या सारखं वाटलं तरी तो तसाच हालचाल न करता उभा होता... इतकं प्रेम होतं त्या मुलांचं त्या तिरंग्यावर, या देशावर, या राष्ट्रगीतावर, या मातीवर!

हाच तो तरुण होता जो पुढे जाऊन या देशाचा नागरिक होणार होता, ज्याच्या मनात या देशाबद्दल प्रेम आपुलकी आणि स्वाभिमान असणार होता. तो हाच तरुण होणार होता, जो या देशात स्वाभिमानी जीवन जगणार होता. जो लाचारी न पत्करता स्वतंत्र असून स्वतंत्र जीवन जगणारा होता. देशप्रेम जागृत राहून जगणारा होता. कुणाची गुलामी करणारा नव्हता. “गुलामी” कुणा व्यक्ती अथवा कुणा विचारांची सुद्धा नाही. हाच तो तरुण होता जो भविष्यात या देशाचं प्रतिनिधित्व करणार होता. आणि हे चित्र ते दाखवूत देत होतं अगदी तसंच जे या देशाला अपेक्षित होतं. प्रत्येकाच्या मनात देशभक्ती रुजत होती, स्वातंत्र्य अंगी येत होतं लाचारी, गुलामी दूर जात होती, आणि देशाला हवा असणारा स्वाभिमानी नागरिक तयार होत होता .

संपूर्ण देशभर हेच चाललं होतं. “सत्यमेव जयते” या ब्रीद वाक्यावर आधारलेला नागरिक या देशाला त्या “सत्यमेव जयते” या वाक्याच्या खऱ्या अर्थाची ओळख करून देत होता.

आज फक्त मी हाच विचार करत होतो, आज कुणास ठाऊक का माझ्या मनात असले विचार येत होते. मी काल रात्री लवकर झोपलो होतो कारण मला आज लवकर उठायचं होतं. रोज तसं मी लवकरच उठतो, मात्र आज थोडं जास्त लवकर उठायचं होतं. लवकरात लवकर शाळेत जायचं होतं, आजचा दिवस इतर दिवसांपेक्षा खूप वेगळा होता. रोजच्या दिवसांपेक्षा निराळा होता. आज माझ्या देशाचा स्वतंत्र दिवस होता. ७१ वर्षांपूर्वी हा इतिहास घडला होता, आणि त्याच्या कित्येक वर्षा

आधी पासून  हा इतिहास घडावा म्हणून किती महान लोकांनी अविरत परिश्रम घेतले होते.

त्या सर्व महापुरुषांच्या त्या प्रयत्नांना फळ मिळालं होतं. आम्ही स्वतंत्र झालो होतो. म्हणून त्या  सर्वांना आठवण करण्याचा हा दिवस होता. तसं त्या सर्वाना कायम स्मरणात ठेवलं पाहिजे.  तेच करत मी सर्व तयारी करून शाळेकडे निघालो बाहेर अंधारच  होता. घरातून निघताना आई सारखी विचारत होती, “अद्वैत बाळा, कुठे चालला रे इतक्या लवकर?”

अद्वैत  .. भेद नसलेला , ‘सर्व एक’ ,  ‘unique’ असं ते नाव ऐकून मला कायम छान वाटे . किती छान नाव ठेवलं होतं आई ने माझं . “अद्वैत” .. .   “तू आणि मी  एकच ” त्या एक असण्यात कुठलीच जात,धर्म, भाषा ,लिंग , रंग  अगदी कसलाच फरक न करता . तू आणि मी आपण सर्व एकच हि भावना कायम मनात व्यक्त करणारं ते नाव .

मी तिला आनंदाने सांगितलं, “आज १५ ऑगस्ट, शाळेत चाललो झेंडा वंदन करायला, तुला नाही माहित का ??”

मग ती मला म्हणे, “माहित आहे रे बाबा,  पण इतक्या लवकर कुठे ?? शाळेत कुणीच नसणार आता!”

तिचं वाक्य मी अर्ध्यातच  तोडत  तिला सांगितलं, “मी चाललो, कुणी राहो अथवा  नको. मी असणार आणि बस्स तेवढं पुरेसं आहे.” मी घरातून उड्या मारत, गाणे गात, सारे जहा से अच्छा हिंदोस्ता हमारा  गुणगुणत जात होतो, बाहेर अंधारच होता, सर्व जण तसे झोपले होते. मी प्रत्येकाचं घराचं दार ठोठवत जात होतो, आणि गाणे गात होतो. बरेच लोक उठून बाहेर आले पण

"माझा पांढरा शुभ्र शाळेचा गणवेष, हातात तिरंगा, शर्टच्या खिशाला तिरंगा, डोक्यावर गांधी टोपी आणि ओठांवर सारे जहा से अच्छा गीत"

या सर्व गोष्टी पाहून तसं मला कुणी रागावलं नाही. एरवी असं केलं असतं तर मी काही तरी खोडकरपणा करत आहे असंच सर्वांनी गृहीत धरलं असतं पण आज तर फक्त मंद स्मित हास्य आणि ते ही मनापासून ...

त्या हास्यात देशाबद्दल आणि देश प्रेम व्यक्त करणाऱ्या बद्दल आदर होता हे कळणं काही अवघड नव्हतं. मी शाळे कडे खूप आतुरतेने निघालो होतो, अजून खूप वेळ होता मात्र इतका वेळ झोपून राहायला मला शक्य नव्हतं.

मी त्या अंधारात थोड्या उजेडात शाळेकडे गाणे गात जात होतो. सर्व थोर व्यक्तींना आठवत. त्यांचे प्रत्येकाचे कार्य आठवत मी जात होतो, फक्त आजच्या दिवस नव्हे तर येणाऱ्या प्रत्येक दिवशी ते सर्वांनी आठवावं असंच त्या सर्वांचे कार्य होते. इतिहासाच्या प्रत्येक पाठात वाचलेलं आणि शिक्षकांनी शिकवलेलं मला आठवत होतं.

या जगात माणसाचं काम त्याला योग्य तो मान सन्मान दर्जा मिळवून देते.

"प्रत्येक व्यक्ती संपूर्ण जीवन स्वतःसाठी आणि आपल्या प्रियजनासाठी जगतो आणि त्यांच्याकडून तशी अपेक्षाही करतो. मात्र ह्या थोर महान लोकांच्या संपूर्ण जीवनात "स्वतः" हा शब्द क्वचितच असतो. आणि त्या मुळेच ते सर्वाना आपलेसे वाटतात, वाटले पाहिजे.

ते स्वतः संपूर्ण आयुष्य इतरांसाठी खर्च करतात, ते देखील इतर सर्वांकडून कुठलीही अपेक्षा न करता. त्याचं मन मुळात तसंच असतं, त्याचमुळे ते महान असतात. अशा सर्व सर्व छान छान गोष्टी मी आठवत चाललो होतो. अर्थात त्या सर्व घटना गोष्टी मी आठवत नव्हतो, तर त्या मला आपोआप आठवत होत्या.

लहानपणापासून शाळेत तेच शिकत होतो, त्यांनाच इतका वाचत होतो त्यांना समजत होतो त्यांच्याइतका नव्हे, पण थोडा फार त्यांचे गुण स्वतः मध्ये

आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत होतो. असं खूप सारं विचार चक्र सुरूच होतं. आणि त्या अंधार असलेल्या सकाळी मीच एकटा त्या शाळेत पोहचलो होतो. अंधारातून उजेड मी पाहणार होतो. मी खूप लवकर तेथे पोहचलो होतो. आता वेळ होती ती सर्वांची तेथे राष्ट्रगीत गाण्याची, पण त्याला अजून थोडा उशीर होता.

माझ्या कानांवर मधुर आणि अगदी मनाच्या अंतकरणातून गायलेलं,

" ऐ मेरे वतन के लोगो,
जरा ऑख मे भरलो पानी...
जो शहीद हुऐ हे उनकी,
जरा याद करो कुर्बानी"

चे मनाला हलवून सोडणारे बोल ऐकू येत होते. मी बाहेर आलो.

शाळेच्या बाहेर एक रस्ता होता, त्या रस्त्याच्या बाजूला एक भलं मोठं झाड होतं. त्या झाडाखाली कुणीतरी बसलेलं होतं आणि काहीतरी करत होतं. मी त्या तेथे गेलो. तिथे एक बाबा बसलेले होते. त्यांच्या जवळ खूप साहित्य होतं जवळ असलेलं साहित्य ते मांडत होते, मी त्यांना मदत करू लागलो, पुस्तके होती, तिरंगा झेंडे होते, हातात पकडण्याचे, खिशाला लावण्याचे, वंदे मातरम असे बरेच वस्तू होत्या. हातात अथवा खिशाला लावता येतील अशा होत्या. मी सर्व मांडणीसाठी त्यांना मदत करत होतो. मी त्यांना त्यांचे साहित्य आणून देत होतो, असा आम्ही दोघांनी मिळून संपूर्ण साहित्य मांडलं.

बाबा मध्ये बसले आणि त्यांच्या शेजारी सर्व सामान मांडलेलं. आता सर्व तयारी झाली होती, आणि उजेडही झाला होता. आता त्या निर्जन रस्तावर गर्दी दिसायला लागली होती. मी शाळेत जाण्यासाठी निघालो, पण जाण्या आधी बाबांनी मला बोलावून एक तिरंगा माझ्या खिशाला लावला. मी नाही बोललो नाही, कारण माझ्या त्या बालमनात देश प्रेम होतंच, ते खिशाला लावून मला छान वाटलं आणि मी बाबांचा निरोप घेऊन शाळेत निघालो.

सर्व मुले शिक्षक इतर पाहुणे आले होते. तयारी सुरु होती ध्वजारोहण करण्याची आणि सर्व मुले रांगेत उभी राहिली. सर्वांचे पांढरे शुभ्र शर्ट अगदी उठून दिसत होते. आणि प्रत्येकाच्या डोक्यावर गांधी टोपी खूप शोभत होती. संपूर्ण मैदान पांढराशुभ्र दिसत होता. जमीन दिसतच नव्हती. सर्व शांत स्तब्ध उभे राहिलो. आणि शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे सूचनेचे पालन करू लागलो.

राष्ट्रीय झेंडे को राष्ट्रीय सलामी देंगे सलामी दो...

सर्वांनी एकत्र उच्चार केला जय हिंद....

राष्ट्रगीत सुरु झालं..

आम्ही सर्व अगदी शांत उभे होतो, प्रत्येकाच्या मुखामधून राष्ट्रगीत बोललं जात होतं. आज आमच्या मधला प्रत्येक मुलगा उस्फूर्तपणे राष्ट्रगीत म्हणत होता. त्याच्या बोलण्यात कोणताही दबाव नव्हता, त्यात देखावा नव्हता, होतं ते फक्त देश प्रेम तेही निस्वार्थी....

यावरून एक गोष्ट लक्षात येत होती, या सर्व विद्यार्थ्यांच्या मनात देश प्रेम निर्माण होत होतं, निस्वार्थ बुद्धीत वाढ होत होती.

असं बोललं तर अतिशयोक्ती होणार नाहीच की ते सर्व विद्यार्थी घडत होते, हेच ते भारताच्या उज्वल भविष्याचे नागरिक. हेच ते ज्यांच्या मनात फक्त सत्य वाढत होतं, बंधुभाव निपजत होता, त्यांना कल्पनाच नव्हती या भारताच्या माथ्याला कलंक लागलेल्या जातीपातीची. त्यांना अजून काहीच कल्पना नव्हती कुठल्याही भ्रष्ट विचार करण्याची. हेच ते नागरिक जे पुढे भारताचं प्रतिनिधित्व करणार होते. आणि हाच विचार किंवा स्वप्न सर्व महापुरुषांचे होतं.

आणि तसंच घडत होतं तिथे आम्ही सर्व विद्यार्थी आमच्याच नाही तर सर्व देशभरातल्या सर्व शाळांमध्ये तसेच विद्यार्थी तयार होत होते. ज्यांना

लहानपणापासून देशावर प्रेम, देशभक्ती, स्वाभिमान, प्रामाणिकपणा अशा गोष्टी नकळत शिकवल्या जात होत्या आणि ते आम्ही शिकत ही होतो, अगदी मनापासून.

लहानपणी असे संस्कार मनात रुजत होते जे भविष्यात एक चांगला माणूस बनण्यासाठी उपयोगी होते. मी शाळेतून बाहेर आलो, आमचे सर्व मित्र खूप आनंदात जात होते. ते निर्मळ मन असणारे शुद्ध चेतना असलेले. मी बाहेर आलो त्या रस्त्या वरच्या झाडा जवळ बसलेल्या बाबांजवळ गेलो बाबांच्या सर्व सामानापैकी जवळ जवळ सर्व समान संपलेलं होतं. तेथे येणाऱ्या प्रत्येक माणसाच्या शर्टला  बाबा स्वतः तो झेंडा तिरंगा लावत होते. आणि  आश्चर्य म्हणजे ते त्यांचे पैसे सुद्धा घेत नव्हते. एक दिवस का असेना देशाबद्दल प्रेम विचार करावा अशीच माफक इच्छा त्यांची असावी.

त्यांच्या चेहऱ्यावर एक आशा होती, अपेक्षा होती, माणसांना बदलण्याची नाही तर माणसाचे विचार बदलण्याची. त्यांच्या चेहऱ्यावर ती एकच अपेक्षा दिसत होती, आणि त्याच अपेक्षेपोटी ते बाबा या सर्व लोकांना बदलण्याचा एक लहानसा प्रयत्न करत असावे. त्यांनी त्यांच्यासोबत खूप सारे पोस्टर्स आणले होते. त्यांच्यावर काही तरी लिहिलेलं होतं. स्वाभिमान, लाचारी, गुलामगिरी, स्वातंत्र्य असं खूप काही.

मी त्यांच्या जवळ जात होतो, आणि अचानक एक मोटारसायकल माझ्या अंगावर आली आणि जोरात हॉर्न वाजू लागला....

मी डोळे उघडले आणि समोर? काय तर... मी माझ्या अंथरुणावर खिळलेलो होतो. समोर ना गाडी होती ना कुठला हॉर्न वाजत होता.  मी स्वप्न पाहत होतो.  आतापर्यंत जे सुरु होतं ते सर्व स्वप्नात होतं.

स्वप्न म्हणजे ???? स्वप्न म्हणजे काय असा प्रश्न कायमच येतो.

“स्वप्न म्हणजे सत्य आणि भ्रम यांच्यातला फरक” , असं बालिश उत्तर मीच देतो स्वतःला.

हे जे काही सुरु होतं ते सर्व माझ्या बालपणी घडलेलं होतं, भूतकाळात घडलेलं, लहानपणी झालेलं. ते सर्व आज माझ्या स्वप्नात आलं होतं.

स्वप्न फक्त मनोरंजनासाठी नसतातच कधी.

या आधी असं स्वप्न कधी आलंच नव्हतं, पण आजच का ???

पण शेवटी ते स्वप्नच होतं.. "स्वप्नाने कधी यावं हे आपण ठरवू शकत नाही . खूप साऱ्या गोष्टी आपण ठरवू शकत नाहीच त्या व्हायच्या तेव्हा आणि तशा होतात."

मी उठून बसलो, डोळे मिटत हात समोर करत आणि हाताकडे बघून मंत्र म्हणत.

काही क्षणांनंतर डोळे उघडले, आणि माझी दृष्टीसमोर असलेल्या दिनदर्शिकेवर गेली, आजची तारीख लाल अक्षरात होती, आज तर रविवार नव्हता पण मात्र तारीख लाल अक्षरात होती. लाल असलेली तारीख सुटीची असते...

आज तारीख १५ महिना ऑगस्ट..

माझ्या डोक्यात एक कळ सर्रकन गेली . आज १५ ऑगस्ट "स्वातंत्र्य दिन" होता. आणि आजचं ते स्वप्न मी पाहत होतो. घड्याळात सात वाजले होते, मी अजून अंथरुणावरच खिळलेलो होतो. ती एक वेळ होती, हा मीच होतो "अद्वैत" फरक न करणारा, जो लहानपणी याच दिवशी पहाटेच उठून बसलो होतो. भल्या पहाटे अंघोळ करून तयार होऊन, इस्त्री केलेले कपडे परिधान करून, मुखात देशगीत, मनात देशप्रेम घेऊन सर्वात आधी शाळेत पोहोचलो होतो, ध्वजारोहण करण्यासाठी.. हा तो मीच होतो. आणि आज सुद्धा तो मीच होतो जो आता याच दिवशी असा निवांत झोपलो होतो. हा मीच होतो, ज्याला आठवण सुद्धा नव्हती या दिवसाची ...

मी कसा तरी घाईत उठलो आणि नावापुरती तयारी करून  कॉलेजला निघालो, आज पांढरा रंगाचा शर्ट नव्हता, आज डोक्यावर गांधी टोपी नव्हती, आज तोंडात गाणे नव्हतं, मनात तो उत्साह नव्हता.

समजत नव्हतं की, **“मी मोठा होउन समजूतदार झालो होतो की, लहान असताना बालिश होतो?”**

मी रस्त्याने जात होतो, रस्त्याने आज खूप लहान मुले शाळेत जात होती, अंगावर पांढराशुभ्र गणवेश होता, डोक्यावर टोपी, ओठांवर वेगवेगळया घोषणा होत्या. मनात देशप्रेम होतं, आणि ती सर्व शाळेत जात होती, अगदी उशीर न करता.

मी हे सर्व दृश्य बघत जात होतो, मीही जात होतो

फरक फक्त इतकाच होता,

ते शाळेत जात होते,  मी कॉलेजला जात होतो

ते लहान होते, मी मोठा झालो होतो

**लहान असतांना नकळत का असेना मी  आनंदाने उस्फूर्तपणे देशभावना व्यक्त करत होतो**, **मात्र आता सर्व कळत असतांनासुद्धा तसं होत नव्हतं**.

मी कॉलेजला पोहोचलो होतो. आमच्या कॉलेजच्या विद्यार्थी संख्या खूप जास्त होती, मात्र आज त्या संखेच्या निम्मीच मुले आली होती, खूप कमी मुले आली होती.

आमच्या  शाळेच्या एकूण संख्येपैकी सर्वच्या सर्व मुले हजार असायची, मात्र आज या कॉलेजच्या एकूण संख्येपैकी अर्धीच मुले  हजर होती,

आणि जे आले होते ते कदाचित भीतीपोटी आले होते, कॉलेजला नाही आले तर दंड आकारला जाईल या भीती पोटी.

आम्हाला स्वातंत्रदिवशी हजर असावे, **यासाठी दंड आकारावा लागतो**.. इतकीच आमची देशभक्ती होती. आजच्या दिवशी आमच्यातले काही सुट्टीचा दिवस म्हणून साजरा करत होते. अगदी आरामात उठून सुट्टीचा आनंद घेत होते.

पण आजचा दिवस सुट्टीचा नव्हताच, आजचा दिवस सन्मानाचा होता.

मी कॉलेजला आलो होतो, देशभक्तीनेच मला उशीर झाला होता, तेवढा उत्साह आता नव्हता, जेवढा मी शाळेत असताना असायचा.. पण मात्र काळजी होती, भावना होती आणि त्या भावनेपोटीच मी इथे उभा होतो.

आम्ही बरेच विद्यार्थी कॉलेजला आलो होतो, बाकीचे सुट्टी समजून घरीच होते, आणि जे आले होते ते देखील न आल्यास दंड द्यावा लागेल या भीतीपोटी आले होते. मात्र एक गोष्ट नक्की सर्वच तसे नव्हते, काही जण खरंच भारताबद्दल प्रेम व्यक्त करण्यासाठी आले होते. आणि त्याचाच आनंद होता; कारण कशाची भीती न बाळगता फक्त आणि फक्त देशाच्या स्वातंत्र्यदिवसासाठी आलेले देखील काही जण तिथे होते आणि त्यांची संख्या ही मनाला समाधान देणारीच होती.

मीही आलो होतो, दंड द्यावा लागेल अथवा दुसऱ्या कोणत्या भीतीपोटी तर मुळीच नाही.

मनात देशभावना होती, देशप्रेम होतं, आदर होता. पण मनात विचारांची झुंबड उडत होती आणि ती का उडू नये?

एका प्रश्नाने तर माझं डोकं गरगरत होतं.

इतका बदल कसा होतो ????,

फक्त काही काळात इतका बदल, अगदी विरुद्ध कसा होतो? या एका प्रश्नाने माझा संपूर्ण वेळ घेतला होता.

नवीन मिळणाऱ्या गोष्टीमुळे मनुष्य मागच्या गोष्टी विसरतो , दुर्लक्षित करतो. जाणून का असेना पण करतो . मानवाचं मन हे असतंच तसं , "तिथेच रमतं, जे तूर्तास आनंद देतं . . तिथेच थांबतं."

आम्ही सर्व मुले कॉलेज पटांगणात एकत्रित आलो होतो. मी कॉलेजला आल्यापासून पहिल्यांदाच इतकी कमी मुले या पटांगणात पाहत होतो, एरवी हे पटांगण खच्चून भरलेलं असायचं. पण तेव्हा दोन फरक असायचे.

एक म्हणजे तेव्हा इतर मनोरंजनाचे कार्यक्रम असायचे आणि ते ही संध्याकाळी. म्हणून गर्दी असायची आज तसं नव्हतं. कार्यक्रम शाळेत असताना असायचे आणि ते ही सकाळी आणि खूप गर्दीसुद्धा असायची. जवळ जवळ सर्वच मुले असायची.

पण आता तसं का होत नव्हतं???

प्रश्न, प्रश्न आणि फक्त प्रश्न.

इतका बदल कसा होतो .??

**वय वाढल्याने व्यक्तीच्या सर्वच गोष्टीमध्ये बदल होतो. मग ते शरीर असो किंवा मन किंवा विचार, मात्र तो सकारात्मक असतो**, वाढ होते, वाढ खुंटल्याचं मी तर आजपर्यंत ऐकलं नाही. मग का इथे घड्याळाचे काटे उलटे कसे फिरतात??

पण तरी आम्ही जमलो होतो कुठल्या ही मनोरंजनाच्या कार्यक्रमाशिवाय...

या मैदानावर समोर तिरंगा फडकवण्यासाठी एक उंच स्तंभ होता, देशाचा फक्त झेंडाच नाही तर संपूर्ण देशाने, त्यातल्या लोकांसहित उंच जावे, त्यांनी प्रगती करावे याचंच जणू ते प्रतीक.

आज तो स्तंभ खूप आनंदित दिसत होता कारण खूप कमी वेळा त्याचा उपयोग होतो आणि आज ती वेळ होती.

**व्यक्ती ज्या कामासाठी बनली आहे, ते काम जर तिने केलं नाही तर तिला किंमत शून्य असते.**

असंच काही तरी त्या स्तंभाचं इतर दिवशी होत होतं. एरवी त्या स्तंभाकडे मी सुद्धा पाहिलं नव्हतं. आजच पाहत होतो.

आम्ही सर्व मैदानात उभे होतो, आता वेळ झाली होती, कॉलेजचे प्राचार्य आले..

समोरून सर्वांना सूचना आल्या, सर्व  एक रांगेत उभे राहिलो.

समोरून मोठ्याने सूचना झाली.

“एक साथ राष्ट्रीय झेंडे को सलामी देंगे... सलामी दो. सर्व एक साथ जय हिंद म्हणाले..

पण तरी कुठे तरी त्या शाळेच्या जय हिंदला तो आवाज पोहचू शकत नव्हता.

तिरंगा फडकला, राष्ट्रगीत सुरु झालं....

आम्ही सारे राष्ट्रगीत म्हणत होतो, मात्र....

कोणताच विद्यार्थी राष्ट्रगीत व्यवस्थित म्हणू शकत नव्हता, सगळयांच्या आवाजात भिन्नता होती, एकत्र आवाज तर दूरच होता, मात्र राष्ट्रगीताचे बोल देखील काहींना अचूक बोलता येत नव्हते. काहींना ते आठवत नव्हते.

या वाक्यात अचंबित होण्याचं कारण नव्हतं,

हे असं कसं होतं हा प्रश्न तर होताच, मात्र याला उत्तर होतं,

शाळेत असतांना आम्ही रोज प्रार्थना आणि राष्ट्रगीत म्हणायचो, मात्र कॉलेजला आल्यापासून ते बंद झालं होतं आणि त्यामुळे सर्व गोष्टींना विसर पडत चालला होता.

शाळेत असताना १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी येण्याच्या १५ दिवस आधी आमची तयारी आमचे शिक्षक करवून घ्यायचे.  असं नव्हतं की त्या वेळेस आम्हाला राष्ट्रगीत येत नव्हतं.. राष्ट्रगीत तर आमच्या मनामनात रुजलं होतं, जिभेवर त्याचे वय उमटले होते...  कारण की आम्ही रोज म्हणायचे पण तरी आमची तयारी होत असे.

पण आताची परिस्थिती खूपच बदलली होती. आता आम्ही कॉलेजला आलो होतो, आणि कुणास ठाऊक ही परंपरा कुठून निर्माण झाली होती?

कॉलेजला आल्यापासून किंवा १० वी केल्यानंतर आत्तापर्यंत फक्त वर्षातून दोनच वेळेस राष्ट्रगीत म्हणायची वेळ आमच्यावर आली होती.

एक म्हणजे १५ ऑगस्ट आणि दुसरं २६ जानेवारी!

इतकी वाईट परिस्थिती आमच्यावर आली होती.

**आणि जर वर्षातून दोनदाच जर ते म्हणण्याची, आठवण्याची वेळ येत असेल तर ते ओठांवर  येईल कसं??? आणि ओठांवर आलं तरी पण मनात उतरेल कसं??**

**आणि पुढे जाऊन देश भावना मनातच नसणार तर ती जीवनात येईल तरी कशी ???**

आणि मग हाच तो भावी, भविष्याचा नागरिक,

तो देशप्रेम व्यक्त करणारा बनेल कसा??

प्रामाणिक बनेल कसा???

सर्वांचे राष्ट्रगीत म्हणून झालं होतं. आता प्रत्येकजण आपापल्या घरी जात होतं, मी मात्र थोडा वेळ तिथेच उभा होतो, मला समोर चाललेलं दृश्य पाहून खूप काही आठवत होतं, मनात खूप सारे विचार येत होते.

मी लहानपणी कसा होतो आणि आता या क्षणी मी काय होतो. नाव तर अद्वैत होतं तेव्हाही आणि आताही. पण त्या दोन अद्वैत मधला फरक मला स्पष्ट दिसत होता.

**मी मोठा झालो होतो, माझ्या मेंदूचा विकास झाला होता, एवढंच काहीतरी घडलं होतं आणि त्यामुळे मी खूप बदललो होतो. माझ्यात अफाट बदल झाले होते. मी मोठा झाल्यामुळे, समजूतदार झाल्यामुळे, मला राष्ट्रगीत म्हणणे, प्रामणिक राहणे येत नव्हतं, किंवा तसं मी जाणूनबुजून करत होतो. माझा मेंदू इतका विकसित झाला होता, की कुणाला कसं फसवायचं, फायद्यासाठी कसं वागायचं हे मला तो अत्यंत योग्य रीतीने सांगत होता.**

पण तरी मी त्या मैदानात समोर ... एक लहान "मी" पहात होतो, माझ्यातला "मी". माझ्यातला अद्वैत जो नावाच्या अर्थाला शोभणारा होता.

तो "मी" जो अगदी प्रामाणिक होता, निस्वार्थी होता, निर्मळ होता, प्रेमळ होता, तो "मी" माझ्यात पहात होतो.

जो अगदी आनंदी होता आणि त्याला पाहून इतरही आनंदी व्हायचे ..

असं दृश्य मी तिथे उभा राहून पहात होतो

तो "मी" आज माझ्यात असता तर ??

असं सर्व लहानपणी घडलेलं मला आठवत होतं.

एक प्रसंग मला अजून आठवतो. त्या दिवशी पाऊस जोरात सुरु होता, आणि शाळेची वेळ झाली होती, आईचा स्वयंपाक सुरु होता, इकडे माझं लक्ष घड्याळाच्या काट्यावरून बाजूला होत नव्हतं. पण आई थांब सांगत होती. थोडं खाऊन जा, नाही तर डबा घेऊन जा असं ती सांगत होती.

ते सर्व बाजूला करत मी फक्त पाऊस बंद होण्याची वाट पहात होतो.

आता खूप उशीर झाला होता. पाऊस कमी झाला. मी तसाच आई येतो म्हणत निघालो, मी धावतच शाळेत पोहचलो, मात्र शाळेच्या गेट जवळ पोहचेपर्यंत राष्ट्रगीताचे स्वर माझ्या कानांना ऐकायला आले. आणि माझ्या मेंदूने सूचना देताच मी जागेवर थांबलो. आजूबाजूला लोक बघत होती, पण तो विचार मनात नव्हताच. राष्ट्रगीत संपलं आणि मी वर्गात जाण्यासाठी निघालो. मात्र आत वर्गशिक्षक पोहोचले होते, त्यांनी मला उशिरा येण्याचं कारण विचारलं, यात अपेक्षित उत्तर.. "पाऊस होता" असं असायला पाहिजे होतं मात्र मी शिक्षकांना सांगितलं मी वेळेतच पोहचलो होतो, मात्र राष्ट्रगीत सुरु असल्यामुळे गेटजवळच थांबलो... त्यांनी थोडसं हास्य करत मला वर्गात बसायला सांगितलं. त्या हास्याचा अर्थ मला न तेव्हा समजला होता न तो आज कळतोय. पण तरी तो प्रसंग माझ्या लक्षात आहे.

असं सर्व विचारांनी माझं मन भरून आलं होतं, विविध विचार माझ्या मनात येत होते आणि आता त्या विचारांना थांबवून मी कॉलेजमधून बाहेर आलो.

बाहेर मी रस्त्याला लागून चालत होतो मनात विचार होतोच, समोर एका दृश्याने माझ्या विचारात अजून भर घातली. समोर एक मोठा वृक्ष होता, वट वृक्ष! सर्वांना अविरत प्राणवायू देणारा, अगदी कसलीही अपेक्षा न करता.. त्या भल्या मोठ्या वृक्षाखाली थोडी गर्दी होती, आणि एक म्हातारे बाबा तिथे काही तरी वस्तू घेऊन बसले होते मी जवळ गेलो आणि त्या ठिकाणी खूप साऱ्या वस्तू मांडल्या होत्या, झेंडे, हातात घेण्याचे, खिशाला लावण्याचे, अशोक चक्र आणि असे विविध देशाचे प्रतीक असलेले वस्तू बाबा प्रत्येकाला बोलावून लावत होते. मी गेलो, बाबांनी माझ्या

रिकाम्या खिशाला एक तिरंगा लावला. आणि काहीच न बोलता दुसऱ्या मुलांना तिरंगा लावू लागले. ते कुणाकडूनच पैसे घेत नव्हते, येणाऱ्या प्रत्येकाला ते अगदी मोफत या गोष्टी देत होते.

**“ या जगात मोफत काहीच नसते, प्रत्येक गोष्टीला काहीतरी किंमत मोजावी लागते. कदाचित ती किंमत दुसरं कुणी तरी मोजत असेल पण मोजावी लागते एवढं नक्की ”**

**आणि बहुतेक वेळेस आपल्याला ते माहित देखील नसतं कि कुणीतरी आपल्या साठी काहीतरी केलं आहे.**

हे सर्व मी या आधीही पाहिलं होतं, आणि आज ते स्वप्नात सुद्धा पाहिलं होतं, शाळेच्या बाहेर भल्या पहाटे ते बाबा आपल्या साहित्याची जुळवाजुळव करत होते. आणि मी त्यांना मदतसुद्धा केली होती, मला मदत करायला आवडतं. तेव्हाही आणि आताही.

कारण लहान आहे, मात्र महत्वाचं आहे.

माझी आजी, जिला मी माय म्हणायचो,

अगदी त्रासामधून संपूर्ण संसार केलेला. जेव्हा वीज खंडित असायची तेव्हा आम्हा सर्वाना घेऊन अंगणात बसणे हा तिचा नित्यक्रम. असं म्हणण्यापेक्षा आम्हीच वीज जाण्याची वाट पाहायचो. कारण दररोज वीज जाणे हे ठरलेलं असायचं. रात्री बाहेर सर्वत्र अंधार असताना, आकाशात फक्त लुकलुक कारणाऱ्या चांदण्या आणि त्या सर्व चांदण्यावर लक्ष ठेवण्यासाठी असलेला एक चंद्र. असं ते दृश्य आणि वर बघण्यासाठी खाली मायची कुशी असायची. आनंदाची व्याख्या ज्याला समजते अशा सर्वांना त्या प्रसंगात किती आनंद सामावला असायचा हे सांगण्याची गरज नसावीच.

अशा त्या एका रात्रीची एक लहानशी कथा, जी कदाचित मायने फक्त वेळ जावा यासाठी सांगितली असेल पण **बऱ्याचदा साध्या साध्या गोष्टी खूप काही परिणाम करून जातात. नकळत का असेना पण परिणाम करतातच**.

मदतीची गोष्ट अजून माझ्या  मनावर तशीच आहे जशी ती माझ्या बालमनावर कोरली गेली होती.

माय सांगायची, **थोड्याशा मदतीने आपण होणारा खूप मोठा त्रास कमी करू शकतो. आणि कदाचित त्याच लहानश्या दुर्लक्ष्यामुळे खूप मोठा त्रास ही होऊ शकतो.**

**"योग्य वेळेवर केलेली मदत ही खूप मोठा सकारात्मक परिणाम करून जाते, आणि नाजूक वेळेवर केलेलं दुर्लक्ष खूप मोठा नकारात्मक परिणाम सोडून जातो. "**

**त्या गोष्टीचा गाभा मला क्षणात आठवून गेला. किती लहान होतं ते, पण अर्थपूर्ण!! त्या न शिकलेल्या माय चं वाक्य .. पण .. किती अर्थ पूर्ण  होतं.**

**"जीवन, आयुष्य लहान असलं तर चालेल पण, अर्थ पूर्ण असलंच पाहिजे."**

**अर्थ नसलेल्या जीवनाला पण काही अर्थ असेल का?? एक विचार डोक्यातून येऊन गेला.**

विचारातून बाहेर येताच माझ्या स्मरणात येऊ लागलं. हे तेच बाबा असतील, जे आमच्या शाळेच्यासमोर लहानपणी होते. असं मला वाटत होतं. मी थोड्या वेळानंतर त्या बाबांशी बोलण्याचा प्रयत्न केला. मी त्यांना एक प्रश्न केला, "बाबा, मी खूप वर्षापूर्वी माझ्या शाळेसमोर एका व्यक्तीला असंच करताना  पाहिलं

होते. तेसुद्धा सर्वांना तिरंगा लावत होते, देत होते आणि पैसेसुद्धा घेत नव्हते, आणि असं केल्या नंतर प्रत्येकाला,

**“सत्य मेव जयते”**

**“भारत माझा देश आहे”**

असं बोलत होते. ते तुम्हीच ना?”

“तेव्हा मी लहान होतो, मी त्यांना त्यांचे साहित्य रचण्यास मदत केली होती, आणि त्यांना विचारलं होतं, की ते येणाऱ्या सर्वांना “सत्य मेव जयते आणि भारत माझा देश आहे” असं का बोलत होते?”

या माझ्या बोलण्यावर मात्र त्या बाबांनी प्रतिसाद दिला. इतका वेळ मी त्यांच्याशी बोलत होतो, मात्र त्यांनी आत्ता ऐकलं होतं,

**बऱ्याचदा कुणीतरी बोलतो आणि ते आपल्याला ऐकू येतं, मात्र, ते ऐकणं असतं का?? ऐकू येणं आणि ऐकणे यात खूप मोठा फरक आहे. ( Hearing & Listening ) “ऐकू आलं म्हणजे आपण ते ऐकलंच**” असा त्याचा अर्थ अजिबात होत नाही.

असंच होत होतं.  मी केव्हापासून बोलत होतो, तेव्हा ते बाबांना फक्त ऐकायला येत होतं मात्र आता शेवटी त्यांनी ते ऐकलं. आणि “**दुसरी गोष्ट ऐकू येण्याला प्रतिसाद नसतोच... प्रतिसाद असतो तो ऐकण्याला. ”** माझं विचारांचे चक्र सुरु होतं.

बाबा माझ्याकडे पहात होते, त्याची अधू दृष्टी त्यांच्या मेंदूच्या स्मरणाच्या भागाला थोडा ताण देत होती, वस्तू, स्थिती, व्यक्ती आठवण्याचा प्रयत्न करत होती.

त्यांचे अपेक्षेने भरलेले डोळे माझ्या त्या डोळयांकडे बघत होते अपेक्षेने.. मात्र ती अपेक्षा स्वार्थाची नव्हती!!

निस्वार्थी अपेक्षा राहू शकते का ??

**जेव्हा स्वार्थ असतो, मात्र तो इतरांसाठी इतरांसाठी, तेव्हा त्याला निस्वार्थच म्हटलं पाहिजे.**

कारण स्वार्थाची व्याख्या थोडी वेगळी आहे. स्वतःच्या फायद्याचा हेतूने केलेली प्रत्येक कृती  म्हणजे स्वार्थ.

पण त्यांच्या त्या अपेक्षेत स्वतःसाठी काहीच नव्हतं तेव्हाही आणि आताही.

यात थोडा वेळ गेला, जो कदाचित त्यांना आणि मला देखील समजला नाही.

मी बाबांना पुन्हा प्रश्न केला “बाबा ते तुम्हीच होते का?”

माझ्या या प्रश्नावर बाबांच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले होते. या पूर्वी काही क्षणापूर्वी ते भाव वेगळे होते मात्र आता पूर्ण बदलले. एका शब्दाने, एका प्रसंगाने मनुष्याचे भाव इतके बदलू शकतात.

एक प्रसंग मानवाचं संपूर्ण जीवन बदलण्यास कारणीभूत राहू शकतो.

वरकरणी तो प्रसंग लहान, कमी महत्वाचा असू शकतो मात्र..  बदल करू शकतो इतकं नक्की.

आता बाबा माझ्याशी बोलायला तयार झाले होते.

**“दोन व्यक्ती तेव्हाच बोलू शकतात जेव्हा त्यांना एकमेकांशी बोलायला आवडेल. आणि फक्त इथेच न थांबता, बोलणारा, बोलत आहे हे ऐकणाऱ्याला सुद्धा आवडत असेल तरच त्यांच्यात विचारांची, भावनेची देवाण-घेवाण होऊ शकते. नाही तर ‘शब्द’ फक्त “ऐकू” येतात “ऐकायला” येत नाहीत ,**

**फक्त “आवाज” येतो त्या “आवाजाचा अर्थ कळत” नाही  .**

**शेवटी "ऐकू येणं आणि ऐकणं " फरक आहेच.**

**नाही तर, बोलणं फक्त आणि फक्त बोलण्यापुरता आणि ऐकण्यापुरताच मर्यादित असतं बस्स."**

"तू तोच का ?? अद्वैत" अगदी आशा भरलेल्या स्वरात ते बोलू लागले.

"होय, मी तोच आहे बाबा, त्या दिवशी शाळेच्या बाहेर झाडाखाली... "

मला वाक्य पूर्ण न करू देताच ते म्हणाले, "होय, लक्षात आहे माझ्या बाळा. "

"त्या गोष्टीला खूप वर्ष होऊन गेलेत तरी तुला अजून आठवण आहे ?" आश्चर्ययुक्त आनंदाने बाबा बोलले.

"होय बाबा, अजूनही मला आठवण आहे. संपूर्ण नाही आठवत पण तो प्रसंग अजून ही आठवत आहेच. पण इतक्या वर्षानंतरसुद्धा तुम्हाला तो लहान मुलगा कसं काय आठवत आहे बाबा?? तुम्हाला रोज किती तरी लोक, मुले, भेटतात आणि इतक्या वर्षात किती मुले भेटली असतील, पण त्या सर्वात तरी मी तुम्हाला आठवलो कसा?? "

"हं... **काही लोक असतात ज्यांना आठवण ठेवावं लागतं आणि काही लोकं असतात जे आठवण राहतात.** आयुष्यात आवडलेला व्यक्तीची कधी आठवण पडते का?? किंवा त्याला कधी विसरता येतं का ??"

बाबांच्या त्या बोलण्यावर मी सहज प्रश्न केला, "आवडता व्यक्ती??"

त्यावर हसत बाबा उत्तरले, "आवडणे म्हणजे, **एखादी गोष्ट जी या आधी आपण कधीच दुसऱ्यात पहिली नाही मग ते काही हि असू शकतं.** असो, त्या दिवशी

तू मला साहित्य मांडायला मदत केली होती आज जमा करायला कर. ”  हसत ते म्हणाले.

मीही साहित्य जमा करू लागलो. बाबा पुढे बोलू लागले, “त्या दिवशी त्या पहाटेचा तो लहान मुलगा, तू, माझ्या लक्षात  आहे  ते म्हणजे त्याच्या लहान वयातल्या मोठ्या प्रश्नामुळे. ” तुला कदाचित आठवत नसेल पण तुझे त्या वेळचे प्रश्न तुझ्या वयाच्या मानाने खूप जास्त मोठे होते.

तू विचारलेला प्रश्न, “सत्यमेव जयते आणि भारत माझा देश आहे असं का बोलतात?”

“मला खूप वर्ष झालीत मी प्रत्येक वर्षी खूप लोकांना भेटतो, मात्र आजपर्यंत कुणीच मला हा प्रश्न केला नाही. अर्थात तो प्रश्न सोपाच आहे, त्यात कठीण असं काहीच नाही पण, मी प्रत्येकाला बोलतो, त्याचा काही उद्देश असेल असं देखील कुणाला विचारावसं वाटलं नाही. शब्द साधा आहे म्हणून कुणाला त्याचा अर्थ विचारावासा वाटत नसावा, पण दुर्देव असं आहे, त्या साध्या सोप्या शब्दाचा अर्थ बहुतेकांना कळलाच नाही, आणि अजूनही तो कळलेला नाही. बहुतेकदा साध्या साध्या गोष्टी अधिक अर्थपूर्ण आणि महत्वाच्या असतात, पण आपण शोधतो ते खूप गंभीर. सत्याच्या आधारावर चालणारा मनुष्य आज सत्याच्या आधाराला चक्क विसरला आहे. आणि इतर गोष्टींनी त्याला जखडल्यामुळे तो सत्याच्या महत्वाला पार विसरून गेला आहे.”

मी बाबांचे बोलणं ऐकत होतो.

मी त्यांना विचारलं, “बाबा, तुम्ही सांगता आहेत हे आहे खरं, पण तुम्ही जे दरवर्षी सर्वांना झेंडे देतात सत्यमेव जयते बोलतात याचा काय उद्देश? का करता तुम्ही असं ??”

यावर बाबा बोलू लागले, “मी हे करण्याचं कारण साधं आहे. **अगदी साधं, मी त्या काळात लहान होतो जेव्हा लोक स्वातंत्र्य मिळण्यासाठी लढत होते, प्राण अर्पण करत होते, त्रास सहन करत होते. कोणत्या ना कोणत्या मार्गाने ते स्वातंत्र्यासाठी कार्य करत होते.**

**ज्या काळात मी मोठा झालो ज्या काळात आपण स्वतंत्र होतो. तेव्हाही मी पाहिलं की लोक मिळालेल्या स्वतंत्राचा कसा लाभ घेत होते. आणि मी आत्ताही पाहतोच आहे की जे मिळालं आहे ते सांभाळणे सुद्धा होत नाही.**

**मी ते ही पाहिलं जेव्हा लोक गुलामगिरीत जन्मले होते, मात्र तरी त्यांनी गुलामगिरी स्वीकारली नाही.**

**मी ते ही पाहिलं जेव्हा लोक पारतंत्र्यात होते पण तरी ते स्वतंत्र असल्या सारखं जगत होते.** मी ते ही पाहिलं, **जेव्हा समोर लाचारीची स्थिती होती तरी त्यांनी लाचारी स्वीकारली नाही. मी तेही पाहिलं जेव्हा स्वाभिमान जपणे हा दंड, अपराध, गुन्हा होता मात्र तरी लोक स्वाभिमान जपायचे फक्त जपायचेच नाही; तर स्वाभिमान जगायचे.** ”

**“हे सर्व मी पाहिलं आहे आणि आता मात्र जीव कासावीस होतो, मनाला एखाद्या विषारी सर्पाने दंश करावा आणि विष शरीरात गेलं तर जीव जायचा राहून फक्त शरीराच्या प्रत्येक पेशीत भयंकर त्रास व्हावा अशीच माझी अवस्था आहे.** जीव गेला तर समोर सुरु असलेलं दिसत नाही मात्र जिवंतपणी होणारा त्रास असह्य करतो. ”

बाबा अतिशय मनापासून बोलत होते. त्यांच्या मनात खूप सारं साठलेलं होतं, जे त्यांना कुणाला तरी सांगायचं होतं आणि ते तस करतही होते. “लोकांच्या मनाला लाचारी, गुलामगिरी, स्वार्थ अशा रोगाची लागण झाली आणि त्याचं वर्चस्व इतकं वाढलंय कि त्यामुळे स्वाभिमान, स्वातंत्र्य या दैवी गुणांचा त्यांना जणू विसरच पडला आहे. ” बाबांचे ते मनाला चटके लावणारं ऐकत असताना मनात प्रश्न आला

आणि मी निःसंकोचपणे बाबांना विचारलं, “बाबा, देश कसा हवा?”

“देश कसा हे तिथे राहणाऱ्या लोकांवर ठरतं. शेवटी देश म्हणजे तरी काय? त्या भागात राहणाऱ्या लोकांचा समूहाच ना?” बाबा बोलू लागले. “आणि इथे माझा देश कसा असावा हे मी सांगण्याची गरजच नाही. हे आधीच खूप साऱ्या लोकांनी सांगून ठेवलंय. तो तोच भारत, जो त्यांच्या स्वप्नातला भारत होता, आहे आणि असला पाहिजे. ” बाबा त्या सर्व महापुरुषांच्या स्वप्नातल्या भारताची कल्पना सांगत होते.

तरी मी त्यांना विचारलंच, “कसा असायला पाहिजे आपल्या, त्यांच्या ‘स्वप्नातला भारत’?”

“ ‘स्वप्नातला भारत’..

तो गांधीजींचाही असला पाहिजे.

तो भगतसिंग राजगुरू सुखदेव यांचा ही असला पाहिजे.

तो बाबासाहेबांचासुद्धा आणि स्वातंत्रवीर सावरकरांचासुद्धा, सुभाषबाबूंपासून तर आझादपर्यंत.

मुळात या सर्वांचा भारत एकसारखाच होता,

तो युगपुरुष विवेकानंद यांच्या स्वप्नातला जगाला दिशा दाखवणारासुद्धा असला पाहिजे.

यापैकी कुणीच आत्मसन्मान विका असं म्हंटल नाही, यापैकी कुणीच स्वाभिमान गहाण ठेवा असं सांगितलं नाही. यापैकी कुणीच गुलामगिरीत जगा असं सांगितलं नाही. जातीपातीसारख्या शापाला वाढवा असं या पैकी कुणीच सांगितलं नाही.

त्यांनी एकच गोष्ट सांगितली, भारत माझा देश आहे!! भारत आपला देश आहे!!!

या एका गोष्टीत ते सर्वच सांगतात. पण आपण वाटणी करून दिली. आणि मग त्या वाटणीचा विचार, मुळात संकुचित विचारांमुळे आज हा प्रश्न येतो. भारत माझा देश आहे का?? असा प्रश्न येण्याचं कारण स्पष्ट आहे. तुम्ही कोणत्याही विचारांचे पालन करणारे असा, डोळे झाकून किंवा अभ्यास करून. तुम्ही कुठल्याही विचार सरणी चे पुरस्कर्ते असा डोळे झाकून किंवा अभ्यास करून. एक गोष्ट शेवटी मान्य करावीच लागेल, आणि ती म्हणजेच '**माझ्या स्वप्नातला भारत, त्यांच्या स्वप्नातला भारत**. ' ती अशी, की आपण कुणाचेही अनुयायी असा, कुणाचेही.... त्यांचा जर नीट अभ्यास केला तर, शेवटी ते असंच म्हणतात**,**

**"भारत माझा देश आहे"** भारत आपला देश आहे. तुमचा माझा आणि सर्वांचा. अगदी निर्विवादपणे.

मग कुठून हा वाद येतो? कुठून हा द्वेष येतो?

कुठून हा भगवा, निळा, पिवळा, हिरवा रंग येतो?

का बरं सर्वत्र तिरंगा येत नाही?? जर तुम्ही ज्यांना मानता त्यांनीच हा तिरंगा स्वीकारला आहे. तर तुम्ही आम्ही कोण ह्या देशाचे आणि तिरंग्याचे एका एका रंगात तुकडे करणारे??"

का बर असा प्रश्न येत नाही .?

"मग म्हणून हा प्रश्न येतो ..

भारत माझा देश आहे का ?? आज प्रत्येकाने स्वतःला हा प्रश्न विचारायला पाहिजे. मग तो कुणीही असो, कुणालाही मानणारा असो, कुणाच्याही विचारांचे

पालन करणारा असो. जर स्वतंत्र बुद्धीने आणि डोळयांवर कोणताही चष्मा न लावता कानांवर कुठलाही पडदा न ओढता विचार केला तर मला खात्री आहे, उत्तर नक्कीच मिळेल. तेव्हा मला सांगण्याची गरज नसणार अथवा दुसरया कुणाला सांगण्याची गरज नसणार. मी कित्येक वर्ष पाहतोय, प्रत्येकाच्या मनात देश भक्ती आहे, प्रेम आहे मात्र दुर्देव आहे; की ते फक्त २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टलाच बाहेर येतं. माझा प्रयत्न आहे ते ३६५ दिवस असलं पाहिजे. आणि त्यामुळे माझ्या परीने तेवढं काम मी करत असतो. ”

“पण मला खात्री आहे, एक दिवस ते होईल कारण मी इतकी वर्ष हे पाहतोच आहे. आणि एक दिवस असा येईल जेव्हा माझ्या मनाला दुर्देवी प्रश्न …

‘**भारत माझा देश आहे??’ हे प्रश्नार्थक वाक्य**

**“भारत माझा देश आहे” या सकारात्मक पूर्णविराम देऊन पूर्ण होईल**. ”

बाबा बोलत होते, त्यांनी पाहिलेलं आणि अनुभवलेलं ते मांडत होते.

मी ऐकत होतो, आणि कुठेतरी मनाला ते पटतही होतं. माझ्याही मनात देशप्रेम होतंच… पण आता या क्षणी ते थोडं कमी झालं होतं. आणि मग मी बाबांना विचारलं, “बाबा, तुम्ही जे करत आहात याच्याने हा बदल शक्य आहे का?” माझा प्रश्न ऐकून बाबांसमोर येणाऱ्या एका लहान मुलाच्या हातात झेंडा देत म्हणाले, “शक्य आहे!”

ते पुढे बोलू लागले,

“मला याची पूर्ण कल्पना आहे की, हे सर्वच वयाच्या लोकांमध्ये होणं थोडं कठीण आहे, पण? एक वर्ग आहे ज्यात ते करणं शक्य आणि सोपं आहे. ”

मी विचारायच्या आधीच बाबा मला थांबवत बोलू लागले.

“बालमन, बालपण.. निरागस, निस्वार्थी, पावित्र्याच्या सर्वच गुणांनी ते भरलेलं असतं जे अगदी कोरं त्यावर जे आपण लिहू ते उमटवणारं आणि त्यांना बदलायची गरज नाहीच फक्त योग्य दिशा द्यायची गरज आहे. ”

बाबांच्या चेहऱ्यावर एक हास्याची लकीर चमकून गेली.

बाबा बोलू लागले,

“व्यक्तीचे विचार हे अनुभवातून, सभोवतालच्या शिक्षणातून तयार होतात. आणि लहान मुले तर सर्वच नवीन शिकत असतात. आणि मी एका मानसशास्त्रज्ञाबद्दल वाचत होतो, तेव्हा तो म्हणाला की, “मला कोणतेही १० नवजात बालक द्या, तुम्हाला त्यांना काय बनवायचं आहे ते सांगा, मी त्यांना तसं बनवून दाखवीन. ”

“आणि मी सुद्धा यावर खूप अभ्यास केला, विचार तर सुरूच असतोच आणि शोधही केलेत. शेवटी लक्षात एकच आलं, जर बालवयातच या विद्यार्थ्यांना असं घडवलं कि त्यांच्या मनात देशाबद्दल, समाजाबद्दल, लोकांबद्दल प्रेम असेल, ज्यांच्या मनात जातीपाती, भेदभाव नसेल, स्त्री सन्मान, मनात रुजलेला असेल, सत्यता रक्तात भिनलेली असेल, प्रामाणिकता असेल, तरच मग ते शक्य होऊ शकतं. अगदी निर्विवादपणे.. कुठलीही शंका न बाळगता. आणि तेच करण्याचा लहानसा प्रयत्न मी करतोय. जर लहान वयातच योग्य ते शिकवलं गेलं आणि तेही परिणामकारक रीतीने, तर?

येणारी पिढी भ्रष्ट नसणार..

निष्ठेने भरलेलीच असणार..

आणि जशी या देशाला शोभेल तशीच असणार!!

आणि तेच भारताचं स्वप्न, तेच त्यांचं स्वप्न, **ज्यांनी हा भारत घडवण्यासाठी प्राण दिलेत, सर्व जीवन खर्ची केलं. अशा सर्वांचा स्वप्नातला भारत** !! स्वप्नातला भारत!! आपल्या आणि त्या सर्वांच्या  स्वप्नातला भारत!!" बाबांचं बोलणं अजून पूर्ण झालं नव्हतं. पण त्या बोलण्यातला प्रत्येक शब्द आणि ती कल्पना माझ्या अंतकरणात आनंदाचा वर्षाव करत होती .

माझ्या मनात आंनदाची एक ठिणगी पडली आणि ज्या प्रमाणे एक ठिणगी पूर्ण वणवा पेटवते, तसा माझ्या मनात विचारांचा वणवा पेटला.

मी विचार करत होतो. "बाबा,  असं होऊ शकतं का ?? लोक बदलू शकतात का?"

माझ्या मनात एकदम प्रश्न आला, आणि ते मी स्वतःसाठी विचारलं होतं. कारण माझ्यात सुद्धा बदल झालाच होता. मी ही थोडा देश आणि प्रामाणिकता याकडे जाणून नाही पण थोडं दुर्लक्ष करतच होतो. पण मी प्रामाणिक होतो लहान असताना ही आणि आता ही.

न चुकता मी प्रत्येक राष्ट्रीय सणाला म्हणजेच २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट ला ध्वजारोहण करण्यासाठी उपस्थित असायचोच. पण तरी थोडा फरक झाला होता, तो स्वीकारण्यात मला कमीपणा नव्हता. माझ्या विचारांना मध्येच पूर्णविराम देत बाबा बोलू लागले,

"शक्य.. सर्व शक्य आहेच. अशक्य असं मुळात  या जगात काही नसतंच. फरक फक्त इतकाच आहे, आधी लोकांना सांगावं लागे की देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढा, आप-आपल्या मार्गाने, कारण आपल्याला गुलाम राहायचं नाही, पण आता सांगण्याची वेळ आली आहे की, स्वातंत्र्य टिकवण्यासाठी लढा. **तेव्हा लढाई ब्रिटिशांविरोधात होती आणि लढणारे भारतीय होते.**

**मात्र आता लढाई काळे, निळे, हिरवे, पिवळे आणि भगव्यासाठी आहे.**

**आणि लढणाऱ्यात भारतीय कुठेच नाही.**

सारेच तसे नाही... **अजूनही भारत मनात असलेले आहेतच आणि असणारच कारण त्यांच्या साठी व्यक्तिगत स्वार्था पेक्षा देशाचे हित जास्त महत्वाचे आहे.**

पण शेवटी एक गोष्ट आहेच,

**ज्या दिवशी प्रत्येक भारतीयाच्या मनात एक प्रश्न येईल, ज्याची बुद्धी शाबूत आहे असा प्रत्येक, ज्याला स्वतःच स्वार्थ अचूक कळतो असा प्रत्येक**, ज्या दिवशी त्या प्रत्येकाला असा प्रश्न येईल की

"का"?? बरं "ते लोक मरण्यासाठी तयार होते?

का ? बरं ते इतरांसाठी स्वतःचे प्राण अर्पण करायला स्वतःहून तयार व्हायचे?

का म्हणून त्यांना पैशाचा लोभ नव्हता?

का म्हणून ते सर्व पैसा, वेळ देशाच्या हितासाठी खर्च करायचे?

का फक्त मीठ उचलण्या साठी प्राण घातक हल्ले सहन केलेत?

का बरं हसत हसत त्यांनी फाशी स्वीकारली?

का बरं तुरुंगवास आणि अजून बरंच काही का ? का ?

का . . . ? ? का . . ? ? आणि फक्त का . .??

त्यांना घरही होतं, परिवारही होताच, जीवनही होतंच.

सर्व सुख सोयी सुद्धा मिळाल्या असत्याच पण ... शेवटी प्रश्न येतोच, का ?

आणि तो प्रश्न यायलाच पाहिजे.

**व्यक्तीचा  निर्णय त्याचं भवितव्य ठरवतो, व्यक्तीची ओळख आणि पुढचं भवितव्य हे सर्व प्रत्येकाच्या त्याने घेतलेल्या निर्णयावरून ठरत असतं.**

**आणि त्या महान लोकांच्या घेतलेल्या त्यागाच्या निर्णया मुळेच तुम्हा आम्हाला हे फुकट मिळालेलं स्वतंत्र दिसतंय.** असे किती का ? आहेतच जे स्वतःला स्वतः विचारले तर उत्तर मिळेलच. आणि विशेष म्हणजे आता कुणी प्राण द्यायलासुद्धा सांगत नाही. फक्त प्रामाणिक, पारदर्शक, देशहित  मग स्वच्छतेच्या बाबतीत असेल किंवा भ्रष्टतेच्या बाबतीत. स्त्रीयांच्या बाबतीत असेल कि कलंक असलेल्या जाती-पातीत.

**लहान लहान गोष्टीपासूनच मोठ्या बदलाची सुरुवात होते आणि कोणतीही मोठी गोष्ट ही आधी लहानच असते.** आणि ज्या दिवशी हे लहान लहान बदल आपण स्वतः मध्ये करू शकलो, त्या दिवशी पुन्हा “माझा भारत महान” “मेरा भारत महान ” म्हणण्यास आणि भारत माझा देश असं म्हणण्यात  मला आणि त्या सर्वांना अत्याधिक आनंद झाल्या शिवाय राहणार नाही .

पण..

का??

प्रश्न विचारला पाहिजे.. तो पर्यंत.. ते जाणीवे पर्यंत नाही पोहोचणार . .? ? ?

जाणीव खूप महत्वाची असते . मग ती कुठल्याही गोष्टीची असो .

जाणीवेच्या कप्प्यात प्रकाश पडल्या शिवाय , चांगल्या गोष्टी उजेडात येत नाहीत??? मी ऐकलेलं आणि एक लहान सत्य, पण परिणामकारक आणि अभ्यासपूर्ण, प्रत्येकाला सत्य वाटेल असं. ”

“मी लहान होतो तेव्हा स्वातंत्राच्या चळवळी सुरु होत्या आणि वयाने म्हातारे मात्र उत्साह आणि कामात. त्यावेळच्या तरुणाला आणि आताच्या तरुणाला सुद्धा लाजवेल असे महात्मा गांधीजी. यांच्या बद्दल मी आमच्या मोठ्या माणसांच्या गप्पा ऐकत होतो.

रात्रीची वीज नव्हती, सर्व तरुण आणि वयोवृद्ध बाहेर बसले होते. त्याकाळी सर्वच गोष्टी बंधनात होत्या. “**नशिबवान ते, जे स्वतंत्र काळात जन्मले पण महान ते लोक ज्यांच्यामुळे स्वतंत्र काळात जन्मण्याचं नशिब लाभलं**. ” त्या गप्पांमध्ये माझ्या त्या बालमनात एक लहान गोष्ट घर करून गेली आणि त्यामुळेच मी हे लहान कार्य करण्याचे धाडस करू शकत आहे. त्या वेळेस गांधीजींची कुठेतरी एक सभा झाली होती आणि त्या सभेत ते सांगत होते. “ जर स्वतंत्र जगायचं असेल, येणाऱ्या पिढीला तुम्हाला झालेला त्रास, शारीरिक आणि मनाचासुद्धा होऊ द्यायचा नसेल, तर प्रत्येकाला या लढ्यात सहभागी व्हावं लागेल. हा तुमचा माझा नाही तर.. या देशाच्या भवितव्याचा प्रश्न आहे. आणि ते भवितव्य आपल्या सहयोगाने पूर्ण होऊ शकतं. ”

“असा तो विषय सुरु होता मी तेथेच होतो आणि ऐकत होतो.

मला ते सर्वच समजत होतं कारण मी ते समजण्या इतपत मोठा होतोच आणि पारतंत्र्य काय हे पाहू शकत होतो.

त्या सभेत एकाने गांधीजींना विचारलं, ‘सामान्य मनुष्य या लढ्यात आपलं योगदान कसं देऊ शकतो ? सामान्य मनुष्य हा स्वतःच पारतंत्र्यात आहे आणि लाचार सुद्धा, गुलाम सुद्धा! मग तो काय करू शकतो?’

यावर बापू  हसत म्हणाले,

**“सोपं आहे! सर्वात आधी, आपण गुलाम नाहीच आणि लाचार सुद्धा नाही. जो पर्यंत आपण स्वताला तसं समजून घेत नाही तो पर्यंत मेंदूला त्याचीच सवय लागेल. आणि राहिला प्रश्न आपण काय करायचा तर, आता तुम्ही जे करता आहेत तेच करा मात्र त्यामुळे आपल्या देशाला, स्वातंत्र्य लढ्याला कसा फायदा होईल तेवढी काळजी घ्या. आपलं काम प्रामाणिकपणे करा  मग ते कोणतेही असो, काही ही असो अगदी प्रामाणिकपणे’**

असं ते सर्व  मी ऐकत होतो. आणि त्यानंतर जेव्हा मग असहकार आणि स्वदेशीसारख्या चळवळी मोठ्या प्रमाणात यश  मिळवत होत्या आणि त्यात जनसामान्यांचा सहभाग  होता,  तेव्हा समजलं की ब्रिटीश राज्यकर्त्यांना  प्रत्येक व्यक्ती  कोणत्या ना कोणत्या रुपात कळत न कळत सहकार्य करत होता. मग सोपं होतं. आप-आपलं सहकार्य थांबवणे मग ते काहीही असो, वस्तू घेण्यापासून तर विकण्या पर्यंत. कपडे असतील, शेतमाल असेल. विदेशी घ्यायचं नाही. स्वदेशीचा पूर्ण स्वीकार. आणि तसं केल्यानंतर जे झालं ते सर्वश्रुत आहेच. इंग्रज नमले. आणि पुढचा मार्ग सोपा होत गेला. त्यांना मिळणारा नफा बंद होत गेला.

आज इतक्या वर्षानंतर सुद्धा ती गोष्ट तितकीच यथार्थ आणि परिस्थिती सदृश्य वाटते. जर आता आपणसुद्धा “ तू, मी आणि सर्वांनी तेच केलं तर? आप-आपलं काम प्रामाणिक आणि देश हिताचं केलं तर? **“त्यांच्या स्वप्नातला भारत.. ”**

आपल्याला भगत सिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद आणि इतर सर्वांसारखं बलिदान  द्यायची गरज नाही. त्याचं बलिदान अनमोल आहे. पण तेवढं नाही तरी त्यांचे वारस शोभू इतकं आपल्या- आपल्या परीने तर आपण करू शकतोच. आणि पुन्हा जर काय करायचं ?? असा प्रश्न आला तर तो गांधीजीचा प्रसंग कायम प्रेरणा देणारच आहे. देश कसा घडतो? हे जास्त अभ्यास न करता देखील सामान्य माणूस समजू शकतोच. एक तर देशात राहणारे लोक ज्यांना आम्ही नागरिक म्हणतो,

**“तो फक्त अधिकाराची  टोपली घेत मागत फिरणारा नाही तर अंगावर पडलेली कर्तव्याची घाण टोपलीत भरणारा सुद्धा असला पाहिजे. ”** आणि दुसरा त्याच नागरिकाला म्हणजेच जनतेच्या विश्वास पात्र नेता आणि अधिकारी, जे जनतेचे सेवेकरी आहेत. जे सर्व विश्वास ठेवणाऱ्या आणि न ठेवणाऱ्याच्या हिताचे कामे करतात, त्यांनी त्यांची कर्तव्य ठीक बजावली तर? पण दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक आहेच. यावर उत्तर म्हणून एक लहान पण पुन्हा कायम प्रेरणा देणारा आणि ती ही राज्यकर्त्यांना, असा प्रसंग आहेच. तो प्रसंग  म्हणजे बाबा साहेब आंबेडकर याचा. **देश चालवणे हे राज्यकर्त्यांचा हातात आहे आणि पर्यायाने देशाची प्रगती आणि अधोगती सुद्धा.** नेमून दिलेलं संविधान कसं उपयोगाचं हे सांगताना बाबासाहेब सांगतात की, संविधान किती चांगलं किंवा किती वाईट हे फक्त आणि फक्त वापर करणाऱ्यांवर अवलंबून आहे. हे म्हणजे राज्यकर्त्यांना दिलेला सल्ला आणि एक पाऊल पुढे जाऊन सांगायचं तर राज्यकर्त्यांना दिलेली समज. त्यांनी जर त्याचं काम केलं तर देश पुढे जाणारच. ”

बाबा त्यांच्या मनात साठलेलं सर्वच सांगत होते. जेव्हा कुणी खूप काही मनातलं सांगत असतो तेव्हा एक गोष्ट तर निश्चित असते.

**“मनात कुठे तरी अनुभवांचा साठा साचला असतो आणि उपसा करण्यासाठी व्यक्ती आणि योग्य ठिकाणाची वाट पहात असतो**.”

बाबा पुढे बोलू लागले, “मला देखील मला प्रश्न पडतोच. का? ते लोक असं करू शकले? का त्यांनी इतका  त्याग केला आणि तो ही कुणाकडे तक्रार न करता? आज सर्व सुविधा असतांना आपण फक्त आणि फक्त तक्रार करतांना दिसतो. ज्या दिवशी तक्रार सोडून आपण स्वतः पुढाकार घेण्याची सुरुवात करू, त्या दिवशी चित्र नक्की काहीतरी निराळं असेल. ”

मी ऐकत होतो. मनात प्रचंड कालवाकालव होत होती. असंख्य प्रश्न मनात गोंधळ घालत होते, पण एक मनाला समाधान देणारी गोष्ट होती. ती म्हणजे, “मला

काचं उत्तर मिळालं होतं. ” आणि जर ते या  देशाच्या नागरिक म्हणवणाऱ्या प्रत्येकाला समजलं तर?

**“त्यांच्या स्वप्नातला भारत... ”**

**“आपल्या स्वप्नातला भारत.. ”**

विचारांचे वादळ थांबवत मी बाबांना विचारलं, “आजची स्थिती पाहता, इतक्या सर्व अपेक्षा लोकांकडून बाळगणे योग्य आहे का?” लोक अपेक्षा पूर्ण करतच नाही हेच सत्य आहे.

हे दुर्देवी सत्य होतं, कारण ते मी स्वतः पहात होतो असं म्हणण्यापेक्षा ते मी अनुभवत होतो.

आम्ही आमच्या स्वार्थामध्ये इतके गुरफटलो आहोत की, इतर सर्वांचे त्याग आम्हाला कधीच समजू शकले नाही आणि ज्यांनी ते समजण्याचे खोटं नाटक केलं ते फक्त आणि फक्त स्वताच्या फायद्यासाठीच.

पण बदल होतो हेही सत्य, पण इतकं सर्व एकाच वेळेस होऊ शकतं का? माझं हि मन थोड खिन्न होत विचार करू लागलं.

यावर बाबा आपलं सर्व साहित्य जमा करत म्हणाले, “अशक्य असं काहीच नाही. प्रयत्न कमी पडले की गोष्ट अशक्य वाटू लागते. ”

आणि मी किंवा देशाच्या हिताचा विचार करणारे खूप जास्त अपेक्षा करत नाहीच, पण फक्त एक गोष्ट जरी केली, तरी सर्व शक्य आहे. आपलं संपूर्ण आयुष्य, आपण जे काही काम करणार आहोत अथवा करत आहोत, ते जास्तीत जास्त देशाच्या फायद्याचं असेल हे जरी केलं तरी ती देशसेवाच असणार. इतकं जरी करता आलं तरी..

**“स्वप्नातला भारत..”**

**त्यांच्या आणि आपल्याही स्वप्नातला भारत बघता बघता तयार होईल, जो या विश्वाचं नेतृत्व करण्यासाठी तेव्हाही सक्षम होता आणि आता पुन्हा नव्याने बहरून येईल.**

फक्त एक प्रश्न आणि एक नियम

एक सवय

एक मानसिकता

एक प्रश्न

का ?? का ? का ?

जो आधीही सांगितलाच आहे,

का ? त्या लोकांनी त्याग केला, निस्वार्थी जीवन जगलं.

आणि एक नियम .. एक बदल.. एक मानसिकता..

ती म्हणजे, "आपण करत असणारं काम हे जितकं जास्त होईल तितकं देशाचं हित जपणारं असलं पाहिजे. मग ते कोणतेही काम असो.. कितीही लहान अथवा मोठं असेल ....

बाबांचे सर्व साहित्य जमा झालं होतं, आजू बाजूला सर्वत्र शांतता होती फक्त आम्ही दोघेच तेथे होतो .

आणि बाबा आपलं सर्व उरलेलं साहित्य घेऊन जायला निघाले.

मी बाबांना सामान उचलण्यास मदत केली आणि न राहून मनात पुन्हा प्रश्न आलाच आणि तसा तो प्रश्न न येऊ देण्याचा मी प्रयत्न सुद्धा केला नाही, कारण,

**योग्य वेळ आणि त्या योग्य वेळेस योग्य व्यक्ती जवळ असणं.. या पेक्षा छान काहीच राहू शकत नाही. म्हणून मी त्यांना विचारलंच.**

बाबा, माझ्या मनात एक प्रश्न अजून खेळ मांडत आहे, "तुम्ही मघाशी म्हटलात की, आपण तेव्हा गुलामगिरीत होतो, लाचारी पत्करावी लागत होती, स्वाभिमान व्यक्त करता येत नव्हता.

पण तेव्हा तर आपण पारतंत्र्यात होतो

आणि आज आपण स्वतंत्र आहोत. "

साहित्य घेत आणि थोडंसं अर्थपूर्ण हास्य करत बाबा माझ्याकडे एक कटाक्ष टाकत म्हणाले,

अद्वैत बाळा

"मी तुला उत्तर देतोच, पण ते अपूर्ण आहे, कारण मला तुला पुढच्या वर्षी याच दिवशी भेटायला आवडेल. तोपर्यंत तुला त्या का? आणि तश्या हजारो का चे उत्तर मिळेलच."

"संपूर्ण समाधान माणसाला नवीन शिकणे थांबायला शिकवतं. संपूर्ण समाधान विचार करण्याच्या प्रवासाला सुद्धा थांबवते. आणि प्रवास कुठलाही असो जर तो थांबला तर . . ध्येय मिळत नाही हे सर्वश्रुत आहे."

आणि महत्वाचं म्हणजे , तो पर्यंत तुला त्या का ? आणि तसे हजारो का ? चे उत्तर मिळेलच .

बाबा जाण्याचा तयारीत दोन पाऊल पुढे होत म्हणाले, **"तेव्हा आपण लाचार होतो, स्वाभिमान व्यक्त करू शकत नव्हतो. कारण आपण गुलाम होतो ब्रिटिशांचे**..

**मात्र आता आपण स्वतःला स्वतंत्र जरी म्हणवत असलो तरी, आपण गुलाम आहोतच ते म्हणजे आपल्या “स्वार्थी विचारांचे. ”**

**“त्या गुलामीतून आपली सुटका झाली, आता या गुलामीतून व्हावी. ”**

बाबांच्या त्या दोन वाक्यांच्या उत्तराने माझ्या जिवंत असलेल्या त्या मेंदूत प्रचंड थैमान मांडलं.

थोडा वेळ तर मला दुसरं काहीच सुचेना.

खरंच का?

आपण अजून गुलाम आहोत?

खरंच का?

आपण लाचार आहोत?

आपण आपला स्वाभिमान सांभाळू शकत नाही?

असे किती तरी

‘का??’ मनात येत होते.

पण उत्तर पण बाबांच्या बोलण्यातच होतं.

“जेव्हा स्वतःला प्रश्न विचारणार, त्या वेळेस उत्तर नक्कीच मिळेल. ” तो बाबांचा आवाज क्षणात माझ्या कानात येऊन गेला. आणि त्या उत्तराच्या शोधात मी घराकडे चालत निघालो. त्या बालपणाच्या “अद्वैत” ला शोधत.

एरवी सर्व शांत होतं सर्वच आपापल्या घरी पोहचले होते.

मी ही निघालो होतो, मात्र मनात मोठा बदल घेऊन. बाबांचा एक न् एक शब्द मनात साठलेला होता.

आणि काहीच अवघड नव्हतं, जे बाबा सांगत होते ते होण्यासारखंच होतं. आपल्याला कुठे जीव द्यायचा होता? कुठे मार खायचा होता? कुठे तुरुंगात जायचं होतं !!

“जर प्रत्येकाने आपल्यातल्या त्या लहान अद्वैताचा शोध घेतला जो प्रामाणिक , देशप्रेमी होता तर . . .”

पण साध्या साध्या गोष्टी होत्या ज्या मोठा बदल करण्यास मदत करू शकणार होत्या.

आणि बाबांची छान कल्पना म्हणजे हे सर्व आता तयार होणाऱ्या पिढीत रुजवायचं, कारण कोणत्याही सामान्य माणसाला कळेल. कारण, “हे बालमन योग्य संस्कार करण्यासाठी अगदी पूरक होतं. ” आणि ते संस्कार आयुष्यभर टिकून राहणायची शक्यता जास्त होती. आताची ही लहान मुले पुढे जाऊन देशाचं प्रतिनिधित्व करणार होती. मग माझ्या मनात तो विचार, ते स्वप्न येऊनच गेलं.

जे “या सर्वांच्या स्वप्नातल्या भारताचं होतं .”

ते सर्वच ज्यांनी देश निर्मितीच्या कामात आपापल्या परीने काम केलं होतं. मनात भारत होता, त्या सर्वांना, बाबांना स्मरण म्हणून मागे पाहिलं (कारण जे घडलं होतं ते मागेच घडलं होतं). तर देशाचा तिरंगा स्वाभिमानाने फडकत होता. अगदी कोणत्याही रंगात फरक न करता.


काळे, निळे, हिरवे पिवळे लाल केसरी सर्वच रंग आपले करून तो तिरंगा फडकत होता.


सर्व रंगानं आपल्यात सामावून , तो तिरंगा फडकत होता .

स्वाभिमानाने . . . . .

आणि ओठांनी मेंदूच्या सूचनेची वाट न पाहताच आवाज केला.....

“ भारत माता कि जय .. जय हिंद.. ”






महात्मा गांधी समाधि राजघाट ला भेट दिली आणि आशीर्वाद म्हणून एक संदेश मिळाला .


NETAJI RESEARCH BUREAU
NETAJI BHAWAN
60


NETAJI RESEARCH BUREAU
NETAJI BHAWAN


नेताजी भवन




स्वा.वीर सावरकर जन्मस्थान भगूर नाशिक



महात्मा गांधी समाधि राजघाट दिल्ली



स्वामी विवेकानंद अंत्यसंस्कार स्थान बेलुर मठ(belur Math) कोलकाता .

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान